Online Journal of Literature....

ज्योतिर्मय — साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ९३ वा ❑ भारतीय सौर दिनांक ३१ वैशाख शके १९४८, गुरूवार दि.२१ मे २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# हुंड्याचा बळी: कधी थांबणार हा क्रूर खेळ?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

इबोला हा एक अत्यंत संसर्गजन्य आणि प्राणघातक विषाणूजन्य रोग आहे जो प्रामुख्याने मध्य आणि पश्चिम आफ्रिकेतील देशांना प्रभावित करतो. याच्या संसर्गाचा मृत्यूदर २५% ते ९०% आहे आणि तो संक्रमित व्यक्तीच्या शारीरिक द्रव्यांच्या (रक्त, लाळ, उलटी) संपर्कातून पसरतो.

अलीकडेच, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो च्या इतुरी प्रांतात (बुनिया, रवामपारा आणि मोंगवालू) इबोलाचा एक गंभीर उद्रेक आढळून आला आहे.

हा उद्रेक बुंदीबुग्यो स्ट्रेनमुळे होत आहे, जो इबोलाचा एक दुर्मिळ प्रकार आहे. काँगोमध्ये ३०० हून अधिक संशयित रुग्ण आणि अंदाजे १३१ मृत्यूंची नोंद झाली आहे.

डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि युगांडा येथे इबोला विषाणूचा पुन्हा उद्रेक झाला असून, यामुळे सुमारे २४६ संशयित रुग्ण आणि ८८ मृत्यूंची नोंद झाली आहेया संकटाच्या पार्श्वभूमीवर, जागतिक आरोग्य संघटनेने याला आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित केले आहे

हा आजार बाधित व्यक्तीच्या शरीरातील द्रव (रक्त, लाळ, घाम, इत्यादी) किंवा प्राण्यांच्या थेट संपर्कात आल्याने वेगाने पसरतो. तीव्र ताप, डोकेदुखी, अंगदुखी, उलटी, जुलाब आणि अंतर्गत किंवा बाह्य रक्तस्त्राव ही याची मुख्य लक्षणे आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस अधानोम गेब्रेयसस यांनी इबोला व्हायरसच्या उद्रेकावर प्रतिक्रिया दिली. वैश्विक महामारी घोषित करण्या इतका इबोला व्हायरसचा प्रसार सध्या नसल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय पातळीवर एकमेकांना सहकार्य करण्याची तसेच इबोला व्हायरसच्या उद्रेकावर लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. काँगोचे आरोग्य मंत्री सॅम्युअल-रोजर कांबा यांनी पत्रकार परिषदेत इबोला व्हायरसच्या उद्रेकाबाबत माहिती दिली. सध्या पसरत असलेल्या इबोला विषाणूवर कोणतीही लस नाही, कोणतेही विशिष्ट उपचार नाहीत, असे कांबा यांनी सांगितले. त्यामुळे इबोला व्हायरसने मृत्यू होण्याचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत वाढू शकते असा गंभीर इशारा कांबा यांनी दिला आहे. इबोला व्हायरस काय आहे आणि त्यावर आतापर्यंत कोणताही उपाय का सापडू शकलेला नाही? याबाबत जाणून घेऊयात.

इबोला व्हायरसचे एकूण सहा प्रकार आहेत. त्यापैकी तीन प्रकारच्या इबोला व्हायरसचा उद्रेक होतो. इबोलाचे  इबोला व्हायरस, सुदान व्हायरस आणि बुंडिबुग्यो व्हायरस हे तीन प्रकार अत्यंत धोकादायक मानले जातात. यांचा संसर्ग वेगाने होते. सध्या इबोलाच्या बुंडिबुग्यो व्हायरसचा उद्रेक झाला असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले आहे.

कोणत्या प्राण्यामार्फत होतो इबोला व्हायरसचा संसर्ग?

फळ खाणाऱ्या वटवाघुळांपासून इबोला व्हायरसचा मानवांना संसर्ग होतो. हा व्हायरस वटवाघुळांमध्ये आढळतो. व्हायरस असलेल्या वटवाघुळाच्या रक्त किंवा लाळेच्या अथवा त्याच्या इतर गोष्टींच्या संपर्कात आल्यास हा व्हायरस मानवांना होतो. तसेच एखाद्या व्यक्तीला इबोला व्हायरसचा संसर्ग असल्यास किंवा त्याचा व्हायरसने मृत्यू झालेला असल्यास अथवा त्यांच्या मृतदेहाच्या संपर्कात आल्यास किंवा त्याचे वास्तव्य होते त्या ठिकाणाशी संबंध आल्यास या व्हायरसचा संसर्ग होऊ शकतो. इबोला व्हायरसने मृत्यू झालेल्याचा अंत्यविधी करताना निष्काळजीपणा केल्यास इबोला व्हायरसची लागण होऊ शकते. या व्हायरसचा संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या रक्ताच्या किंवा लाळेच्या संपर्कात आल्यास इबोला व्हायरसची लागण होण्याचा धोका सर्वाधिक असतो. पश्चिम आफ्रिकेत या आधी झालेल्या उद्रेकात तब्बल ११ हजारांहून अधिक जणांना प्राण गमावावे लागले होते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार या व्हायरसने मृत्यू होण्याचे प्रमाण ५० टक्के आहे.

इबोलाचा प्रादुर्भाव सध्या आफ्रिकन खंडापुरताच मर्यादित असला, तरी जागतिक आरोग्य संघटनेने शेजारील देशांमध्ये (जसे की केनिया, युगांडा आणि सुदान) हाय अलर्ट जारी केला आहे इबोला हा वेगाने पसरणारा आजार असला तरी आंतरराष्ट्रीय प्रवासावर पूर्णपणे बंदी घालण्याची सध्या कोणतीही शिफारस करण्यात आलेली नाही

सध्या पसरलेल्या बुंदीबुग्यो प्रकारावर कोणतीही मान्यताप्राप्त लस किंवा निश्चित उपचार उपलब्ध नाहीत.सतर्क राहण्यासाठी आवश्यक पावलेसंशयित किंवा बाधित लोकांच्या थेट संपर्कात येणे टाळा.वैयक्तिक स्वच्छता राखा आणि हात वेळोवेळी साबणाने स्वच्छ धुवा.

# ७००० लीटर आमरस, १ टन पुरण अन् ५०० जावयांचा थाट

## अधिकमास निमित्त भव्य 'धोंड्याच्या जेवणाचा' सोहळा

**रविवारपासून अधिकमासला सुरुवात झाली आहे. अधिकमास हा समस्त जावाई मंडळींचा सन्मानाचा महिना. या महिन्यात प्रत्येक घराघरांत जावईबापूंचं औक्षण केलं जातं, विशेष पाहुणचार केला जातो, धोंडा दिला जातो आणि त्यांना भेटवस्तूदेखील दिली जाते. या निमित्तानेच आगडगावात अधिक मासानिमित्त भव्य 'धोंड्याच्या जेवणाचा' सोहळा आयोजित करण्यात आला.**

**ज्योतिर्मय साहित्य**

**अहिल्यानगर (अनिकेत यादव) :** अधिक मासाच्या पवित्र पर्वाला सुरुवात होताच श्री क्षेत्र काळभैरवनाथ आगडगाव येथे भक्ती, परंपरा आणि अन्नदानाचा भव्य संगम पाहायला मिळाला. देवस्थानच्या वतीने तब्बल ५०० जावयांसाठी पारंपरिक धोंड्याच्या जेवणाचा थाट मांडण्यात आला असून, १५ हजारांहून अधिक भाविकांसाठी महाप्रसादाची भव्य तयारी करण्यात आली आहे. गावासह परिसरात या अनोख्या सोहळ्याची जोरदार चर्चा रंगली आहे. अधिक मासात जावयांना मानपान देण्याची जुनी परंपरा जपत आगडगाव देवस्थानने यंदा हा सोहळा अभूतपूर्व पद्धतीने साजरा केला. गावात आलेल्या सर्व जावयांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. त्यांना पाच पोशाख भेट देण्यात आले, तर मुलींना पैठणी देऊन सन्मान करण्यात आला. यानंतर सवाद्य मिरवणुकीने



संपूर्ण गाव भक्तिमय आणि उत्सवी वातावरणात न्हाऊन निघाले.

तब्बल ३५०० किलो केशर आंबे आणि १००० लिटर दुधापासून १५ मोठ्या पातेल्यांमध्ये जवळपास ७ हजार लिटर आमरस करण्यात आले.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरला तो महाप्रसादासाठी तयार करण्यात आलेला विक्रमी आमरस. याशिवाय पुरणपोळीच्या जेवणासाठी एक टन हरभरा डाळीचे पुरण बनविण्यात आले असून, हजारो भाविकांसाठी स्वयंपाकाची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

देवस्थान परिसरात पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. पारंपरिक वाद्यांचा गजर, धार्मिक वातावरण आणि अन्नदानाचा भव्य सोहळा यामुळे आगडगावात अधिक मासाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. भक्ती, परंपरा आणि सामाजिक ऐक्य जपणारा हा सोहळा आगडगावची ओळख बनला आहे अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेली महाप्रसादाची तयारी आणि जावयांचा पारंपरिक सन्मान यामुळे श्री क्षेत्र काळभैरवनाथ आगडगावचा हा सोहळा जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

**आयोजक काय म्हणाले?**

''हिंदू धर्मात अधिकाचा महिना आजच्या तारखेपासून सुरु होतो. कालच शनि जयंती झाली. त्यानंतर आज रविवार. रविवारी महाप्रसाद काय असावा? तर आमरसाचा बेत ठरला. आमरस असताना धोंडा द्यायचा म्हटल्यावर पुरुणपोळी दिली पाहिजे. त्या पुरणपोळीसाठी एक हजार किलो हरभऱ्याची डाळ खरेदी केली. पुरण बनवलं. त्याचे जवळपास दहा हजारापर्यंत होतील असे धोंडे बनवले. धोंडा म्हणजे गव्हाचं पीठ आणि त्यामध्ये पुरण घालून तळलं जातं. तो धोंडा प्रत्येक जावायाला देणार आहोत.''

''पुरणपोळी केली आहे. बाजारातून साडेतीन हजार किलो केशर आंबा आणलेला आहे. त्या केशर आंब्याचा सात हजार लीटर एवढा आमरस या ठिकाणी तयार होईल. हा आमरस सर्व जावायांना आपण देणार आहोत. याचबरोबर जावायांसाठी पाच कपडे आणि लेकींना पैठणी साडी दिली आहे. त्याचबरोबर त्यांना सोबत पूजेचा ताट म्हणून तांब्याचा ताट आपण देत आहोत. त्याचबरोबर निरंजन आहे, बत्तासा आहे, अनारसा आहे, हे सर्व पॅकेज साडेतीन हजार रुपयांत दिलेलं आहे. हे साडेतीन हजार रुपये त्यांच्या सासऱ्याने भरलेले आहे. जावायाची पूजा या ठिकाणी होत आहे. हा उपक्रम तीन वर्षांपूर्वी केला होता. त्याचप्रकारचा प्रतिसाद यावर्षी भेटत आहे.''

( सौजन्य : म टा )

# जीवन शिक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

''आई, कसलं मस्तै हे इग्लू !'' अतिउत्साहाने कृष्णा जवळजवळ किंचाळलाच. ''नारळाची करवंटी, कापूस वापरून केलंय असं वाटतच नाहीये, तू कम्मालैस आई!'' अशी पुस्तीही त्यानं जोडली. तेवढ्यात वैष्णवी म्हणाली, ''तू फक्त एक वस्तू पाहिलीयेस आईनं केलेली. टाकाऊ पासून टिकाऊ बनवण्यात ती पटाईतय''

''म्हणजे? अजून काय काय बनवलंय आईनं?'' त्यानं विचारलं. मग  तिच्या टेबलचा कप्पा  तिनं उघडला. रंगीबेरंगी कागदापासून केलेली चटई, काडेपेट्यांचं डायनिंग टेबल, आईस्क्रीमच्या काड्यांपासून फुलदाणी, पिस्त्याच्या टरफलांपासून फुलं आणि बरंच काही.

कृष्णाला दीदीचा हा कप्पा म्हणजे अलीबाबाची गुहाच वाटली.

आई काय कमाल कलाकार आहे असंही त्याला वाटलं. ''आई, हे तुला कुणी शिकवलं गं?'' आपसूकच हा प्रश्न त्यानं विचारला.

''आमच्या शाळेत हे शिकलोय आम्ही'' अभिमानाने माझी कॉलर ताठर झाली.

''तुझी शाळा गं कुठली?'' ओघानं आलेला प्रश्न.

दीदी पटकन म्हणाली, ''जीवन शिक्षण विद्या मंदीर''

''आणि बाबा, तुमची शाळा कुठली?''

परत दीदींनी तेच उत्तर दिलं.

त्याला नवल वाटलं.

''जीवनशिक्षण म्हणजे काय?''  त्यानं विचारलं.

''जीवन जगताना जी काही कौशल्यं लागतात, तीआमच्या शाळेत आम्हाला शिकवली जात होती म्हणून आमची शाळा जीवन शिक्षण विद्या मंदीर ''बाबा उत्तरले.

''म्हणजे नक्की काय काय शिकवायचे शाळेत तुमच्या?'' पुढचा प्रश्न आलाच आणि चर्चेला रंग भरला.

''अगदी शाळेचा परिसर स्वच्छ करणं, केरसुणीनं वर्गखोल्या स्वच्छ करणं, जमीन शेणानं सावरणं, जाळ्या जळमटं काढणं, कच-याची योग्य विल्हेवाट लावणं, परिसरात फुलझाडं लावणं, त्यांची निगा राखणं, पताका तयार करणं, त्यासाठी कागदकाम, खळ तयार करणं, रांगोळी काढणं, एकमेकांना मदत करणं, वडिलधाऱ्यांचा आदर करणं  , शाळेत आलेल्या पाहुण्यांचं आदरातिथ्य करणं, याबरोबरच संयम, सहानुभूती, साधेपणा अशा अनेक गोष्टी आम्ही शाळेतच शिकलोय.'' शक्य तितक्या गोष्टी आठवण्याचा प्रयत्न करत बाबांनी माहिती पुरवली.



कृष्णा म्हणाला, ''आम्हाला तर मराठी, इंग्रजी, गणित, इतिहास भूगोल असे विषय आहेत. संयम सहानुभूती साधेपणा असे विषयच नाहीत आम्हाला ''

बाबा म्हणाले, ''अरे, हे विषय तर आम्हालाही नव्हते पण आमच्या शिक्षकांच्या वागण्यातून साधेपणा आम्ही शिकलो. कमी साधनांत समाधान होतं पूर्वी, स्वतःचा वर्ग स्वतः साफ करायचा, कुणा सोबतच्या मदतीची गरज असेल तर ती करणं, कुणी पडलं रडलं तर त्याला समजावून सांगायचं, साधेपणानं  सगळे सण शाळेत साजरे व्हायचे, कार्यानुभव हा खास विषय होता आम्हाला, सुईत धागा ओवणं, बटण लावणं, घरकामात मदत करायला शिकायचो आम्ही. तशी खास शिबिरं असायची स्काऊट गाईडची, उन्हाळी सुट्टीत आम्हाला गृहपाठ दिलेला असायचा.. तेही फक्त पुस्तकी नव्हे; तर स्वकमाई. खरोखरच कुठेतरी काम करायचं त्याचा मोबदला घ्यायचा आणि शाळा सुरू झाली की तो संकटग्रस्तांना पाठवून द्यायचा. अशा गृहपाठातून आम्ही कष्ट करायला शिकलो, पैसे मिळवायला किती कष्ट पडतात याची कल्पना आम्हाला आली आणि शिवाय आपल्या कमाईतला वाटा समाजासाठी  द्यायचा हे संस्कार आमच्यावर शाळेनं केलेत. रांगेत उभं राहून शांतपणे आपला नंबर येण्याची वाट बघायची.'

बाबांना मध्येच थांबवत कृष्णा म्हणाला, ''रांगेत तर आम्हीपण थांबतो पण आमचा वर्ग मात्र आम्ही स्वच्छ करत नाही बरं का बाबा''

बाबा म्हणाले, अगदी गुणी मुलं आहात तुम्ही  आणि आताही

ब-याच शाळा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त उपक्रम राबवत असतातच. फार काही निराशाजनक परिस्थिती नाहीये पण टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवणं आता पूर्वीसारखं राहिलं नाही. फार कमी पालक मुलांकडून अशा वस्तू घरच्या सामानात बनवून घेतात, नाहीतर सरळ विकत आणतात आणि मुलंही कंटाळा करतातच. शॉर्टकटची सवय आणि चटक लागलीय सगळ्यांना मी म्हटलं, ''डबाभोजन कसं करायचो आपण ते मुलांना जरा सांगा ना'' हा विषय ऐकायला मिळणार म्हटल्यावर मुलं खुलली.

''एक दिवस असा असायचा आमच्या शाळेत सगळ्यांनी आपापल्या घरुन डबा घेऊन यायचं आणि सगळ्यांनी मिळून सगळे पदार्थ फस्त करायचे. कुणीही कुणाच्याही डब्यातले पदार्थ खावेत. वाटून खाण्याची मजा डबा भोजनात अनुभवता यायची. शिवाय चवीमध्ये विविधता''. बाबांनी सांगितलं ''बाबा, सण साजरा कसा करायचा तुम्ही शाळेत? ''हा कृष्णाचा प्रश्न येताच बाबांना पाटीपूजन आठवलं. कोळशाच्या साहाय्याने पाटी घासून स्वच्छ करायची, त्यावर सरस्वतीचं चित्र काढायचं, गूळखोबरं-खाऊचं पानं, आपट्याची पानं, फुलं ठेवायची.. बाबा स्मरणरंजनात रंगून गेले आणि कृष्णा आईबाबांच्या जीवन शिक्षण विद्या मंदिराची कल्पना करण्यात रंगून गेला.




वरवर पाहता हा संवाद साधा, कौटुंबिक आणि आठवणींना उजाळा देणारा  वाटतो; पण त्यामागे दोन पिढ्यांमधील शिक्षणाच्या मूल्यांचा तौलनिक विचार दडलेला आहे.

आजच्या शिक्षणपद्धतीचा विचार करता पाठ्यपुस्तकं, विषय कितपत समजला यापेक्षा गुण किती मिळाले, गुणानुक्रम यांवरच भर दिला जातो. म्हणजे विद्यार्थी हा ज्ञानार्थी झाला नाही तरी चालेल पण तो गुणार्थी करण्यावर अधिक भर दिला जातो. तसं पूर्वी शाळेतच जीवन जगण्याचं कौशल्य शिकवलं जात होतं स्वच्छता, सहकार्य, साधेपणा आणि सृजनशीलतेतून.

याच शिक्षणातून रुजलेल्या सृजनशीलतेचं  आणि स्वावलंबनाचं प्रतीक असलेले आईबाबा म्हणजे कृष्णाला नवल वाटत होतं. ''आम्हाला असे विषयच नाहीत'' या त्याच्या वाक्यातून आधुनिक शिक्षणातील एक मोठी उणीव अधोरेखित होते.


बाबांच्या आठवणींमधली शाळा ही संस्कारांची कार्यशाळा होती. तिथे संयम, सहानुभूती, साधेपणा हे शिकवले जात नव्हते,  तर ते अनुभवले जात होते. याउलट, आजच्या शिक्षणात या मूल्यांची जाणीव कमी होत चालल्याची खंत या संवादातून व्यक्त होते.

म्हणूनच हा प्रसंग ''असं का'' या सदरासाठी मला योग्य वाटला, कारण हा संवाद थेट प्रश्न विचारतो 'शिक्षणाचं खरं उद्दिष्ट बदललं आहे का? आणि  आपण काही महत्त्वाचं तर गमावत चाललो नाही ना?'

हा लेख आताच्या शिक्षणव्यवस्थेकडे नव्याने पाहायला मदत करण्यासाठी आहे आणि हाच या लेखाचा खरा हेतू आहे.

याच विचाराला पुढे नेलं तर असंही जाणवतं की, आजच्या शिक्षणात माहितीचं प्रमाण वाढलं असलं तरी अनुभवांची उणीव जाणवते. पुस्तकं, डिजिटल साधनं, प्रोजेक्ट्स या सगळ्यांमधून ज्ञान मिळतं; पण त्या ज्ञानाला जीवनाशी जोडणारा दुवा मात्र कमकुवत होत चाललाय. पूर्वी छोट्या-छोट्या कृतीतून शिकलेली मूल्यं नकळत आयुष्याचा भाग बनायची. आज मात्र त्यासाठी वेगळे वर्ग, वेगळे उपक्रम, संस्कार वर्ग आयोजित करावे लागतात, खरंतर यहे खेदजनक आहे. त्याचबरोबर कृष्णासारख्या मुलांच्या मनात निर्माण होणारं कुतूहल हीच खरी आशा आहे.

आता गरज आहे ती जुन्या मूल्यांना नव्या पद्धतीने जपण्याची. अभ्यासासोबतच अनुभव, गुणांसोबतच गुणात्मकता आणि स्पर्धेसोबतच सहजीवनाची जाणीव यांचा समतोल साधला, तरच शिक्षण खऱ्या अर्थाने ''जीवन शिक्षण'' ठरेल.



## जात्यावरच्या ओव्या......


काय सांगू महती
पारंब्या टेकल्या वडाच्या
बाबाच्या मांडीवर
नाती बसल्या लाडाच्या ||६५१||

काय सांगू महती
राऊळा कळस सोन्याचा
सांज सकाळी गजर
ऐका हरि च्या नामाचा ||६५२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३२

ज्योतिर्मय साहित्य




अहिल्या शिळा राघवे मुक्त केली।
पदी लागता दिव्य होऊन गेली ।
जया वर्णिता शीणली वेदवाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।३२।

अर्थ : श्रीरामांच्या पदाचा स्पर्श होताच शिळा झालेली शापित अहिल्या मुक्त झाली. त्यांच्या पदस्पर्शाने तिचा उद्धार झाला. अशा या भगवंताचे वर्णन करताना वेद सुद्धा शीणले आहेत म्हणजे थकले आहेत किंवा त्याचे वर्णन ते करू शकत नाहीत. असा हा अहिल्येचा उद्धार करणारा भगवंत आपला देखील उद्धार केल्याशिवाय राहणार नाही.



विवेचन : या श्लोकांमध्ये समर्थ भगवंताच्या पराक्रमाचे आणि गुणांचे वर्णन करत आहेत आणि आपल्या भक्तांना तो कशाप्रकारे तारतो हेच यातून आपल्या मनावर ठसवत आहेत. आधीच्या श्लोकामध्ये भगवान रामाने रावणाच्या बंदिवासात असलेल्या देवांना मुक्त केले असे समर्थांनी सांगितले. या श्लोकात श्रीरामांच्या पदस्पर्शाने अहिल्येचा कसा उद्धार झाला ही गोष्ट ते आपल्याला सांगत आहेत.

अहिल्या ही गौतम ऋषींची पत्नी अत्यंत रुपवती आणि शीलवती होती तसेच ती महान साध्वी आणि पतिव्रता होती. इंद्र तिच्या सौंदर्यावर मोहित झाला आणि गौतम ऋषींचे रूप घेऊन त्यांच्या आश्रमात आला. परंतु काही कथांनुसार इंद्राने तिचे शीलभ्रष्ट करण्याआधीच अहिल्येने त्याला ओळखले आणि तो परत फिरला. तर काही कथांनुसार इंद्राच्या कृत्याला ती बळी पडली आणि तिचे पातिव्रत्य भंग झाले असे म्हटले जाते. याच सुमारास गौतम ऋषी आपल्या आश्रमात परत आले आणि त्यांना अहिल्येच्या पातिव्रत्यावर संशय आला आणि त्यांनी तिला तू शिळा होऊन पडशील असा शाप दिला. वास्तविक हे सगळे जे काही घडले यात अहिल्येचा काहीही दोष नव्हता.

खरंतर मूळ वाल्मिकी रामायणात गौतम ऋषींनी अहिल्येला शाप दिल्याची आणि ती शिळा होऊन पडल्याची नोंद नाही. तुलसी रामायणात आणि इतरही अनेक ठिकाणी मात्र ही कथा सांगितली गेली आहे.

समर्थांनी मूळ वाल्मिकी रामायणाचा बारकाईने अभ्यास केला होता. अशा प्रकारची घटना त्यात नाही हे माहीत असताना देखील ते या ठिकाणी त्या घटनेचा उल्लेख करतात. त्याचे कारण म्हणजे ही घटना सर्वांनी स्वीकारली आहे. दुसरी म्हणजे ती रामाची महती सांगणारी आहे. समर्थांचे आराध्य दैवत श्रीराम असल्यामुळे श्रीरामांची महती सांगणारी कोणतीही गोष्ट असेल तरी त्यांना ती मान्य होते.**(क्रमशः)**





------- *संकट आले असता* -------

आलेच संकट। त्यातूनच वाट।
काढा पटापट। सुज्ञपणे ॥१॥
संकट पाहून। तुम्ही रडायचं।
किंवा लढायचं। हे ठरवा ॥२॥
रडत बसता। एकच होईल।
तुम्हा संपवेल। ते संकट ॥३॥
संकट प्रसंगी। थांबवा रडणे।
त्याच्याशी लढणे। श्रेयस्कर ॥४॥
संकटाशी जर। धैर्याने लढाल।
नि:पात कराल। संकटाचा ॥५॥
माधव हा म्हणे। होता निरुपाय।
लढणे उपाय। अंगिकारा ॥६॥




◆आत्मविश्वास
कोणतेही काम करताना ते मला व्यवस्थित जमणार आहे हे मनाशी ठेवा आणि कामं करा म्हणजे ते नक्कीच होते, त्यासाठी आधी आपला आत्मविश्वास मजबूत असणे जरुरी आहे. आत्मविश्वासच यशाचं मोठं गमक आहे.

## नामस्मरणापरते दुसरे हित नाही



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

एक गृहस्थ मला भेटले. ते म्हणाले, ''मला देव पाहावासा वाटतो. तुम्ही पाहिला आहे का ?''मी म्हटले, ''पाहिला आहे.'' त्यांनी विचारले, ''तो मला दिसेल का ?'' मी म्हटले, ''दिसेल, पण या डोळ्यांनी दिसणार नाही. देवाला पाहण्याची दृष्टी वेगळी आहे.'' आज आमची विषयाची दृष्टि आहे. ती भगवंताची नाही. आपल्याला भगवंत पाहायचा असेल तर त्याला एकच उपाय : भगवंताच्या नामात राहावे. नामाशिवाय दुसरा मार्ग नाही. सगळ्यांना माझे सांगणे आहे; हे ऐकणे अत्यंत जरूर आहे. बरे ! ऐकणे कशासाठी ? तर मी बरोबर मार्गाने जातो आहे की नाही, ते कळण्यासाठी. पण नुसते ऐकून चालणार नाही; ऐकून कृती केली तरच साधेल. ती तुम्ही करा. आचरणात आणलेले तेवढेच कामाला येईल. सगळ्यांनी नामस्मरण करा. नामस्मरणासारखा कल्याणाचा दुसरा मार्ग नाही. जे सहज आपल्याजवळ आहे, अत्यंत उपाधिरहित आहे, जे कुणावर अवलंबून नाही, असे जर काही असेल तर ते भगवंताचे नाम आहे. तेव्हा शुद्धतेने, शुद्ध आचरणाने जो ते घेईल, त्याचे राम खरेच कल्याण करील.

आपल्या गुरूने जे सांगितले ते सत्य मानावे. या मार्गाने शंभर पावले गेलास तर खजिना सापडेल.' असे गुरूने सांगितले, तर दुसऱ्या मार्गाने दोनशे पावले जरी गेला तरी त्याचा काय उपयोग ? 'मला सगुण साक्षात्कार व्हावा' असे म्हणतो, पण प्रत्यक्ष बोलणारा चालणारा सद्गुरू पाहून समाधान होत नाही तर परमात्म्याचे दर्शन करून देऊन काय उपयोग ? आंबा हवा असेल तर कोय पेरल्याशिवाय कुठला मिळणार ? सद्गुरूने जे सांगितले त्यापरते माझे काही हित आहे, हे मनातच येऊ नये. आपण खरोखरी सर्वस्वी त्याचे व्हावे. नामस्मरणापरते दुसरे हित नाही. माझ्या नामाने घरात आजारी पडलेला मनुष्य बरा व्हावा म्हणणे, म्हणजे त्या नामाचा विषयाकडे उपयोग नाही का केला ? बरे झाल्यावर ज्याप्रमाणे आम्ही बाटलीतले औषध टाकून देतो, त्याप्रमाणे गरज संपली की आम्ही देवाला विसरतो. अमुक एक घडावे असे जिथे वाटते तिथे साधनात कमतरता आली. एका सद्गुरुवचनावर विश्वास ठेवला म्हणजे सुखदु:खाच्या गोष्टींचा मनावर परिणाम होत नाही. मोठा अधिकारी झाला तरी पोराबाळांबरोबर खेळताना ज्याप्रमाणे तो त्यांच्यासारखा होतो, त्याप्रमाणे व्यवहारात वागावे. आपण निर्लोभतेने वागावे. खेळात ज्याप्रमाणे आपण चुकू देत नाही, त्याप्रमाणे प्रपंचात करावे. प्रपंचाचा सहवास वरवरचा असावा. त्याचा वास आत नसावा. आत फक्त भगवंताचा वास असावा.

गुरूचरणी अत्यंत विश्वास । आणि साधनाचा अखंड सहवास । येथे प्रपंचाचा सुटला फास । हाच परमार्थाचा मार्ग आहे खास ।।

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

◆ पाप, पुण्य टाळता येते का?

मागील अंकावरून पुढे.....
जळो आगी पडो खान नारायण भोगीता/
ऐसी ज्याची वदे वाणी नारायणी ते पावे/
भोजन काळी करिता धंदा म्हणा गोविंदा पावले/ तुका म्हणे न लगे मोल देव बोलू आवडता.
फला भिलाषेविन/ नित्य नैमित्त जाण/ करावे गा कृष्णार्पण/अर्पिती खूण जाणोनी//
याकरता फळाचा अभिलाष न धरता नित्य नियमितिक करणे अर्पणाची खूण जाणून कृष्णा अर्पण करावे
धरूनी मदर्पणाचे बळ/ नित्य आचरता निर्मळ/ चित्ताचे चैत्य मळ/ जाती तात्काळ नासोनी //
प्रत्येक कर्म मला अर्पण करण्याचे पाठबळ घेऊन निर्मळ कर्माचे आचरण केले असता चित्ताचे मळ तात्काळ नाश पावतात.
जाहल्या चित्त मळ क्षाळने/ नित्य विवेकू उपजे तेणे/इहा मुत्रा लाता हाणें/ अनित्य त्यजने वैराग्ये//
चित्तातील सारे मळ धुवून गेले म्हणजे नित्य वस्तूचा विचार मनात उद्भवतो. आणि इह परलोकाच्या सुखावर लाथ मारून वैराग्याने आनित्याचा त्याग करतो. क्रमश:.....




◆नवनवीन भाषा-गोष्टी शिका

आज आपण"डिजिटल देश पहात आहोत.
पहात आहोत. तसे रहात आहोत, आचरण करतो, आधुनिक जीवनपध्दती व करिअरसाठी हे आवश्यक आहे. तंत्रज्ञान व संगणक युग यासाठी आपण इग्रंजी व ईतर गोष्टी अंगीकार केलाच पाहिजे. जगाबरोबर जाण्यासाठी तंत्रज्ञान, नविन कौशल्ये शिकावी लागणारच! त्यामुळे प्रगती होईल, तसेच भाषेच आहे.आज इग्रंजीबरोबर संस्कृत हिंदीसह जपानी जर्मन भाषेचे वर्ग वाढत आहे. बर्याच शहरातून'ऑनलाईन' परदेशी भाषावर्ग चालत आहे. म्हणून मॅनेजमेंटचं गुरू
रघूरामन सांगतात "फंडा असा आहे की, नविन गोष्टी भाषा शिकून गोष्टी सोप्या करणे, सकारात्मक विचार करून निरोगी खाणे, व्यायाम ध्यान चालणे, सामाजिकरण कृतज्ञता, सुर्यप्रकाश, निसर्ग संगीत विश्रांती यामुळे सर्व वयात भरपूर ऊर्जा मिळते. याऊलट तानतनाव व्यसने,
भिती, दारू, घाबरणे,जास्त पैसे, झोपेचा अभाव, नकारात्मकता भूतकाळाचा जास्त विचार केल्याने ऊर्जा कमी होते, म्हणून आनंदी जगा.
आज एवढे पुरे. काळजी घ्या
गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो.




## उंबर (औंदुंबर) - एक आध्यात्मिक वृक्ष

ज्योतिर्मय साहित्य

उंबर जिथे आहे तिथे श्री. दत्तगुरुंचा वास असतो,असे हिंदू धर्मात मानले जाते. याच्या औषधी गुणांमुळेच उंबराच्या वृक्षाला आध्यात्मिक महत्व आहे. तेव्हा हा वृक्ष आपल्याला अमाप अशी निसर्गदत्त, औषध योजना बहाल करतो.



उंबराच्या सालीचा काढा करून , त्यांत, वेलची, खडीसाखर टाकून सरबत करावे, कँसर सारख्या रुग्णाच्या अंगाचा जो दाह होतो, त्यावर आराम पडतो. दिवसांतून तीनदा घ्यावे. औंदुबरावलेह हे प्रसिद्ध औषध पित्तज विकारांवर प्रसिध्द आहे.

जखम झाल्यस याच काढ्याने धुतल्यास, ती वेगाने बरी होते. अतिसाराच्या वेळी रक्त पडल्यास हाच काढा घ्यावा. गर्भाशयाची सूज कमी करण्यासाठी, रक्तप्रदर, श्वेतप्रदर, मासिकधर्म जास्त जात असेल, तर सालिचा काढा, पोटातून देतात. गर्भपात, होउ नये म्हणून, गर्भाचे पोषण निट व्हावे म्हणून, याच्या सालिचा काढा घेतात.

भस्मक नावाचा रोग आहे त्यांत सारखी भूक लागते. पोट भरल्याची जाणीव होत नाही. तेव्हा, उंबराची साल दूधांत घोटून द्यावी. कावीळीत, उंबराचे पिकलेले अर्धे पान विड्यातून देतात.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

ज्वरदाह, तीव्र तापात, पिकलेले उंबर द्यावे,गोवर, कांजण्या, अतिसार, उन्हाळी, मधुमेह, या सर्व रोगांवर उंबराचे फळ, पाने, फुले उपयोगात आणली जातात.

किटकदंश, विंचूदंश झाल्यास झाडाची पाने वाटून लावल्यास, दाह, वेदना, कमी होतात. तोंडातले अल्सर, व्रण, छाले, यावर उंबराच्या पानावर असे बुडबडे वर दिसतात. ते काढून त्याचि चटणी मधातून चाटण म्हणून द्यावे. तोंडाचा दाह कमि होतो..

अंगात उष्णता, कडकी असल्यास उंबराची दोन फळे रोज सकाळी खडीसाखरेसोबत खावीत.

तृष्णेचा आजार बरा होतो. जेव्हा खुप तहान, तहान होते, जीव कासावीस होतो, तेव्हा उंबराची साल, वा कच्ची फळे पाण्यात कुस्करून सरबत करून द्यावे

डांग्या खोकल्यावर उंबराचा चिक टाळूवर लावावा ताबडतोब थांबतो.

किडनि स्टोन (मूतखडा) – उंबराच्या जुन्या झाडाच्या खोडाला खाच द्यावी व तिथेच एक भांडे अडकावे रात्रभर रस झिरपून भांड्यात गोळा होईल, तो सकाळी पिण्यास घ्यावा. किडनी स्टोन वितळून मूत्रावाटे बाहेर पडतात.

उंबर फळ दूधांत शिजवून खाल्ल्यास पचनसंस्था मजबूत होते, पोटाचे सर्व विकार बरे होतात. विशेषतः हे थंड गुणधर्माचे असल्यानेच, आम्लपित्त, मळमळ, पोटात दाह, अल्सर, सारखे आजार याच्या सेवनाने बरे होतात.




आनंदाचे डोही

आम्ही सर्व आहोत
आनंदाचे डोही छान
साहित्याचे खरे वारकरी
शब्दांची गुंफूनी माळ
भाव मांडतो मनातले
पुस्तकरुपी गुरुचे पूजारी

आनंदाचे डोही आम्ही
सु:ख देवू - घेवू
द्वेषभाव नको मनी
मदत करुन एकमेकांना
वेदना दूर करता
आनंद नांदो जीवनी

# पारो - निखळ, नितळ, पवित्र प्रेमाचे प्रतीक

**ज्योतिर्मय साहित्य**

अजिंठा येथे उत्कट प्रेमाचे प्रतीक म्हणून बांधलेल्या पारो च्या समाधीला शनिवारी, २३ मे २०२६ रोजी १७० वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजेच पारोचा हा १७० वा सृतिदिन होय. यानिमित्त बिटिश कलाकार, चित्रकारावर निखळ, नितळ आणि पवित्र प्रेम करणाऱ्या पारोच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

पारो-गिल यांच्या प्रेमकहाणीवर अजिंठा नावाचा एक मराठी चित्रपटही येऊन गेलेला आहे. अजिंठ्यातील स्थानिक भिल्ल किंवा आदिवासी समाजातील जन्मजात आदिवासी सौंदर्य लाभलेली पारो आणि चित्रकलेच्या माध्यमातून तत्कालीन परिस्थितीत अजिंठा लेणी जगासमोर मांडणारा महान ब्रिटिश चित्रकार म्हणजेच रॉबर्ट गिल यांच्यातील प्रेमकहाणी या भागात प्रसिद्ध आहे. १८४३ पर्यंत रॉबर्टने सैन्यदलात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर काम केले. ईस्ट इंडिया कंपनीने त्याच्यातील सुप्त कलाकाराला ओळखून, त्याच्यातील कलागुण पारखून १८४४ ला अजिंठ्यातील चित्र-शिल्पांच्या आरेखनासाठी अजिंठा येथे नियुक्ती दिली.

मुलखावेगळी जोडी

रॉबर्ट गिल मे १८४५ ला अजिंठ्याला आला. अजिंठा येथील सैन्य प्रशिक्षण केंद्राच्या स्थानिक वैद्यकीय उपचार केंद्रात त्याचे वास्तव्य असे. त्या ठिकाणी आज ग्रामीण रुग्णालय अस्तित्वात आहे. त्यासमोरील प्रवेशद्वारावर असलेल्या इमारतीत रॉबर्ट गिल अनेक वर्षे राहिला. त्याला स्थानिक लोक गिल टोक म्हणून ओळखत असत. देश वेगळा, भाषा वेगळी, संस्कृती वेगळी तरीही परस्परांवर जीवापाड प्रेम करणारे हे जोडपे मुलखावेगळे!



माय बिलव्हड पारो...

अजिंठा लेण्यांची चित्रे कॅनव्हासवर उतरविण्यासाठी आलेला तो आणि त्यात रंग भरण्यासाठी जंगलातल्या फुलांचे रंग आणून देणारी ती या दोघांची प्रेमकहाणी जेवढी रंजक आहे, तितकेच कहाणीचे आयुष्यही खूपच कमी आहे. एकदा रॉबर्ट त्याच्या कामानिमित्त मायदेशी परतला, तेंव्हा पारो गरोदर होती आणि हीच बातमी तिच्या समाजाला समजली, समाजात पसरली तेंव्हा सर्वांनी तिचा २३ मे १८५६ रोजी जीव घेतला. त्या समाजाला हे बंधनविरहीत आगळंवेगळं प्रेम मंजूर नसावं. रॉबर्ट जेव्हा भारतात परतला, तेव्हा त्याला ही अत्यंत वाईट घटना समजली आणि तो अत्यंत विदारक स्थितीत पोहोचला. त्याच्या हातात काहीही नव्हतं. त्याला जपणारी, प्रचंड जीव लावणारी पारो या जगात नव्हती. तो अतिशय हतबल झाला होता. ही प्रेमकहाणी केवळ दहा-अकरा वर्षेच चालली. आपल्या प्रेयसीबद्दल असलेल्या अत्यंत प्रेमापोटी रॉबर्टने तिची कबर अजिंठा येथे आत्ताच्या पोलिस ठाण्याच्या परिसरात बनविली. त्यावर टू द मेमरी ऑफ माय बिलव्हड पारो हू डाईड २३ मे १८५६ अशा ओळी तिच्या समाधीवर लिहिल्या. माय बिलव्हड पारो या अत्यंत कमी शब्दांत रॉबर्टने त्यांच्या प्रेमाची गहनता आणि पारोबद्दल असलेली व्याकुळता व्यक्त केली आहे. हे तीन शब्द आजही संवेदनशील व्यक्तीला वेगळ्या जगात घेऊन जातात आणि शून्य, निराश आणि स्तब्ध असं वाटायला लागतं. रॉबर्टने आपलं प्रेम या समाधीतून अमर केलं. भाषेच्या अडचणीमुळे पारो आणि रॉबर्ट यांचा मौखिक संवाद कमीच असावा, पण भावनिक नातं खूप घट्ट होतं. पारोच्या आठवणीत तो वेड्यासारखं जगत राहिला असावा.

**डॉ. युवराज सुतार**
मो. ७७४३८ ४७४१९
(लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इंगजी विभागात सहायक प्राध्यापक आहेत)

पारोशी...मातीशी एकरूप !

गिलने अजिंठा लेणीतील चित्रांच्या प्रतिकृती अत्यंत मेहनतीने तयार करून त्या युरोपात पाठवल्या व त्याची प्रसिद्धी केली. त्यामुळे जगाला अजिंठामधील भित्तीचित्रांची ओळख पटली. परंतु, दुर्दैवाने आज त्यातील काहीच पेंटिंग बाकी आहेत, तर अनेक कालौघात नष्ट झाल्या आहेत. त्या काळात अजिंठ्याच्या लेण्यांभोवती कसलीही सुरक्षा नव्हती. त्यामुळे जंगली प्राण्यांची भीती आणि आदिवासी लोकांपासून स्व:संरक्षण करत तो चित्र रेखाटन करत होता. ना. धो. महानोरांनी त्यांच्या अजिंठा कवितासंग्रहात त्याचे सुंदर काव्यमय वर्णन केलेले आहे. पारोच्या आठवणीत गिलने निवृत्तीनंतर इंग्लंडमध्ये जाण्यापेक्षा भारतात राहणे पसंत केले. अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशमधील मनस्वी कलाकार, अजिंठ्याची पेंटिंग आणि पारोचं प्रेम यामुळे या मातीशी एकरूप झाला. तो भारतात जवळपास ३० वर्षे राहिला.

सत्व, स्वत्वाचे प्रतीक

१० एप्रिल १८७९ रोजी खानदेशच्या कडक उन्हाळ्यात भुसावळच्या रेल्वे हॉस्पिटलमध्ये गिलचे उष्माघाताने निधन झाले. त्याच्या निधनानंतर भुसावळ रेल्वे स्टेशनलाच लागून असलेल्या सेंट पॉल चर्चच्या दफनभूमीत त्याचे दफन करण्यात आले, तेथे त्याचे थडगे आजही अस्तित्वात आहे. एक प्रज्ञावंत अष्टपैलू चित्रकार अजिंठ्याच्या मातीत विलीन झाला. कोणतीही भावनिक व्यक्ती या समाधीस्थळास भेट देते, तेंव्हा भावनाविवश होतो. प्रेम माणसाला जात, धर्म, पंथ, देश, सत्व आणि स्वत्व हे सर्व-सर्व विसरायला भाग पाडतं, याचं हे अजरामर उदाहरण म्हणावे लागेल.

# तुक्याची आवली

**ज्योतिर्मय साहित्य**

आवली, संत तुकाराम महाराजांची द्वितीय पत्नी.. एवढीच काय मज ओळख... तेवढ्यात हातात बक्षीस रूपात माझ्या हातात एक सुंदर अशी कादंबरी मिळाली ती म्हणजे तुक्याची आवली. पुस्तक वाचताना हळूहळू आवली मला कधी उलगडली, कधी भावली, कधी माझी झाली ते कळलंच नाही.

आवली, आप्पाजी गुळवे पाटील यांची लाडाची लेक. अगदी लाडाकोडात वाढलेली. देहूतील बोल्होबा आंबिले यांचे सुपुत्र तुकाराम. यांचा आधी विवाह झाला होता, पहिली पत्नी दम्याच्या आजाराने ग्रस्त होती. मृत्युपथाला लागली होती, याच कारणास्तव आवली आणि तुकाराम विवाह बंधनात अडकले. सुरुवातीची काही वर्षे सुरळीत गेली.तुकाराम सौम्य, शांत स्वभावाचे. बोल्होबांचे दुकान उत्तम सांभाळीत होते. पांडुरंगावर निस्सीम भक्ती करत होते. सर्व काही व्यवस्थित चालले होते.

पण त्यानंतर मात्र एका मागून एक दुःखे दोघांच्या संसाराला वेढून टाकायला लागली. सासू - सासऱ्यांचा मृत्यू आणि लगेच आला तो महाभयंकर दुष्काळ... गोकुळासारखी नांदणारी गावं स्मशानं बनू लागली. अशा परिस्थितीत संत तुकाराम पार कोलमडून गेले आणि त्यांनी धाव घेतली ती विठ्ठलाची... दिवस रात्र ते विठ्ठलाला साकडं घालू लागले. कीर्तन, प्रवचन, अभंग यातच त्यांना गोडी वाटू लागली आणि संसार

सौ. योगिता सुधीर गोरड
शिरवळ.

नको नको वाटू लागला. जसे ते विठ्ठलाच्या जवळ जाऊ लागले तसे तसे ते आवली पासून पोराबाळांपासून लांब लांब जाऊ लागले, आवलीची मात्र यात फरपट होत होती. त्या कर कटेवर ठेवून विटेवर उभ्या असणाऱ्या काळ्या विठ्ठलाचा तिला फार राग येऊ लागला. आपल्या संसाराचं वाटोळं याच्यामुळेच झालं म्हणून ती दिवस रात्र त्या पांडुरंगाला बोल लावत होती. आपल्या धन्याला समजावून सांगत होती. पण तुकारामांनी कधीच पांडुरंगाच्या पायी तन-मन-धन अर्पण केलं होतं. आवली मात्र एकटी परिस्थितीशी झुंज देत होती. एक हाती लढाई चालू होती. आपला संसार देवानेच दृष्टाळला आहे असं म्हणत होती. संतापाने काही बाही बोलत होती पण त्याचा ना तुकारामावर ना विठ्ठलावर परिणाम होत होता. लोकांच्या लेखी भांडखोर, कजाक, तोंडाळ अशीच ती होती. पण ती माऊली एकटी संसाराचा गाडा उपसत होती म्हणून संत तुकारामांना विठ्ठलाची सेवा करता आली .ज्या विठ्ठलाला उठता बसता आवली शिव्या देत होती, त्याच विठ्ठलाला आवली आजारी असताना प्रत्यक्ष तिची सेवा करायला यावे लागले. संत तुकारामांना प्रपंच सोडून परमार्थ निर्विघ्नपणे करता यावा म्हणून स्वतः पांडुरंग त्या दोघांचा प्रपंच सावरत होता . आकाशाएवढे झालेले तुकाराम, आवली सारखी धरणी डोकं टेकायला होती म्हणूनच एवढे मोठे झाले हे नक्कीच विसरता कामा नये. त्या कर कटेवर ठेवून विटेवर उभ्या असलेल्या विठुरायाला देखील मान्य करावा लागलं कि ती होती फक्त तुक्याचीच आवली...

या लेखातून कोणाच्या भावना दुखावण्याचा माझा कोणताही हेतू नाही.मनाला भावलेली आवली ईथे फक्त व्यक्त झाली आहे.


# अधिक मासात अधिक फळ देणारी उपासना

**ज्योतिर्मय साहित्य**

अधिक मास ज्याला पुरुषोत्तम मास असे म्हणतात. हिंदू पंचांगानुसार दर तीन वर्षांनी येणारा हा अतिरिक्त म्हणजेच तेरावा महिना. चांद्र वर्ष ते ३५४ दिवसाचे असते तर सौर वर्षे ३६५ दिवसाचे असते. या दोन वर्षातील अकरा दिवसाचा फरक भरून काढण्यासाठी हा अधिक मास दर तीन वर्षांनी जोडला जातो. कालगणनेतील समतोल राखण्यासाठी भारतीय पंचांगात येणारा हा अधिक महिना आहे. हा महिना भगवान विष्णूंना समर्पित असून यात दानआणि धार्मिक कृत्ये याला विशेष महत्त्व आहे असे मानले जाते. ज्योतिष शास्त्रानुसार सूर्य आपल्या आत्म्याच्या तर चंद्र हा मनाचा कारक समजला जातो. आत्मा आणि मन यात सुसंवाद राहतो. वैदिक काळात अधिक महिन्याला संसर्प, मलीमलूच असे म्हटले गेले आहे. या महिन्याचे संदर्भ वैदिक साहित्यात आढळतात. त्यावेळी सौर कालगणना आणि चांद्रगणना अस्तित्वात होती.

**धार्मिक महत्त्व :** अधिक मास हा पुरुषोत्तम मास म्हणून ओळखला जातो.या महिन्यात विष्णू देवतेच्या उपासनेला अनन्य साधारण महत्त्व आहे .भागवत पुराणाचे वाचन, भागवत कथा सप्ताह, स्नान,दान याचे आचरण या महिन्यात करावे .अधिक मासात भारतभरातील विष्णूच्या मंदिरात विशेष पूजाचे आयोजन केले जाते. महाराष्ट्र बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात गोदावरी नदीच्या तीरावर पुरुषोत्तम पुरी येथे पुरुषोत्तम मंदिर वसलेले आहे. या ठिकाणी अधिक मासात संपूर्ण महिनाभर धार्मिक उत्सव आयोजित केले जातात.

**खगोल शास्त्रीय महत्व** - पृथ्वीच्या सूर्याभोवतीच्या भ्रमणामुळे सूर्य हा १२ राशीतून प्रवास करत कालचक्राचे एक वर्ष पूर्ण करतो.( ३६५दिवस ,पाच तास, ४८ मिनिट ४७ सेकंद एवढा वेळ लागतो.) तर चंद्राचे पृथ्वी भोवती प्रदक्षिणावर आधारित असलेले चांद्र वर्ष ३५४ दिवसातच पूर्ण होते. चंद्राची प्रदक्षिणा अकरा दिवस आधी पूर्ण होते. महाराष्ट्र ,गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटकात चांद्रमास हे अमांत आहे अमावस्याला संपणारे तर उत्तरेला ते पूर्णीमांत पोर्णिमेला संपणारे. असतात. तीन वर्षातील अंतराचा ३३ दिवसाचा फरक क्षय देऊन ही कालगणना सूर्याधारीत सौर वर्षाची जुळवण्यात येते.




**भारतातील प्रांतानुसार** - सूर्याधारीत पंचांग पाळणारे आसाम, ओरिसा, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यात अधिक महिना नसतो. चांद्र पंचांग वापरणाऱ्या आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश या राज्यात अधिक महिना पाळला जातो .चैत्रापासून अश्विन महिन्यापर्यंत कोणताही एक महिना अधिक मास म्हणून येऊ शकतो .या महिन्यात सूर्याची गती कमी असते त्यामुळे या राशीतून त्या राशीत जायला वेळ लागतो.

**अधिक मासात काय करावे** - या महिन्यात ओम नमो भगवते वासुदेवाय या मंत्राचा नित्य जमेल तितका जप करावा .या महिन्यात तीर्थयात्रा करून गंगेत स्नान करावे .साधु संत यांच्या सहवासात राहून सत्संग करावा. धर्मकार्या विषयी मनात तळमळ निर्माण करावी. त्यात कशी रुची वाढेल यासाठी प्रयत्न करावा? अधिक मासात दीपदान करणे अत्यंत फलदायी मानले जाते. हा महिना अध्यात्मिक प्रगतीसाठी उत्तम मानला जातो .भगवत गीतेतील पुरुषोत्तम योग हा पंधरावा अध्याय नियमितपणे वाचावा. याच्या वाचनाने पितृदोष निवारण होऊन अक्षय पुण्य प्राप्त होते. या महिन्यात जावयाची पूजा करून त्याला ३३ अनारसे द्यावे आणि यथाशक्ती दान करावे.

**अधिक मासात काय करू नये** - या महिन्यात शुभकार्य, गृहप्रवेश, मौजीबंधन, बारसे, विवाह अशी मंगलदाय कार्य करू नये. अशुद्ध आचरण कधी करू नये.

या महिन्यात दत्तगुरूच्या चरणी सेवा अर्पण करावी. गुरुचरित्र पारायण करावे आणि ते शक्य नसेल तर काही विशिष्ट कारणासाठी ठराविक अध्यायाचे वाचन करावे,

१. कर्जमुक्तीसाठी :- चौथा अध्याय वाचणे अत्यंत प्रभावी आहे.

२. संकट निवारणासाठी : १४ व्याअध्यायाचे वाचन करावे.

३. नकारात्मक ऊर्जेतून मुक्ती : यासाठी १८ व २१ हे अध्याय एकत्र वाचावे.

या अध्यायाच्या वाचल्यामुळे अखंड सौभाग्य प्राप्त होते. समृद्धी नांदते. मनातील इच्छा पूर्ण होण्यासाठी पारायण लाभदायक ठरते . आयुष्यातील अडथळे दूर होतात. हे अध्याय वाचताना शुद्ध अंतकरणाने आणि दत्तगुरुवर श्रद्धा ठेवूनच पठण करावे .

या महिन्यात आपणा सर्वांचे आध्यात्मिक प्रगती होऊन हीच गुरुच्या चरणी प्रार्थना.

**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495

मागील अंकावरून पुढे....

शुभ-अशुभ शकुन भविष्यवाणी,
"त्रिशङ्कुर्लोहिताङ्गश्च बृहस्पतिबुधावपि।
दारुणाः सोममभ्येत्य ग्रहाः सर्वे व्यवस्थिताः ॥
नक्षत्राणि गतार्थीपि ग्रहाश्च गततेजसः।
विशाखाश्च सधूमाश्च नभसि प्रचकाशिरे ॥
कालिकानिलवेगेन महोदधिरिवोत्थितः।
रामे वर्न प्रव्रजिते नगरं प्रचचाल तत् ॥
दिशः पर्याकुलाः सर्वास्तिमिरेणेव संवृताः।
न ग्रहो नापि नक्षत्रं प्रचकाशे न किञ्चन ॥"
(वा०रा० २।४१।११-१४)
"यदाप्रभृति वैदेही सम्प्राप्तेह परंतप।
तदाप्रभृति दृश्यन्ते निमित्तान्यशुभानि नः ॥
सस्फुलिङ्गः सधूमार्चिः सधूमकलुषोदयः।
मन्त्रसंधुक्षितोऽप्यग्निनं सम्यगभिवर्धते ॥
अग्निष्टेष्वग्निशालासु तथा ब्रह्मस्थलीषु च।
सरीसृपाणि दृश्यन्ते हव्येषु च पिपीलिकाः ॥
गवां पयांसि स्कन्नानि विमदा वरकुञ्जराः।
दीनमश्वाः प्रहेषन्ते नवग्रासाभिनन्दिनः ॥
खरोष्ट्राश्वतरा राजन् भिन्नरोमाः सवन्ति च।
न स्वभावेऽवतिष्ठन्ते विधानैरपि चिन्तिताः ॥
वायसाः संघशः क्रूरा व्याहरन्ति समन्ततः।
समवेताश्च दृश्यन्ते विमानाग्रेषु संघशः ॥
गृधाश्च परिलीयन्ते पुरीमुपरि पिण्डिताः।
उपपन्नाश्च संध्ये द्वे व्याहरन्त्यशिवं शिवाः ॥
क्रव्यादानां मृगाणां च पुरीद्वारेषु संघशः।
श्रूयन्ते विपुला घोषाः सविस्फूर्जितनिःस्वनाः॥"
(वा०रा० ६।१०।१४-२१)

"हे पराक्रमी रावणा!
ज्या दिवसापासून सीता (वैदेही) लंकेत आली आहे,
त्या दिवसापासून आम्हाला सतत अशुभ संकेत दिसत आहेत।
अग्नी प्रज्वलित केला तरी तो नीट पेटत नाही;
त्यातून ठिणग्या, धूर आणि काळसर ज्वाळा निघतात।
यज्ञकुंड, अग्निशाळा आणि वेदपठणाच्या जागी
साप दिसतात आणि हवनसामग्रीत मुंग्या पडतात।
गायींचे दूध आटले आहे;
हत्तींचा मद (उत्साह) निघून गेला आहे;
घोडे दुःखी स्वरात हंबरतात।
गाढवे, उंट आणि खच्चर
अस्वस्थ होऊन केस ताठ करतात आणि विचित्र वागतात;
उपचार करूनही ते पूर्ववत होत नाहीत।
कावळे समूहाने कर्कश आवाज करतात;
ते राजवाड्यांच्या माथ्यावर जमलेले दिसतात।
गिधाडे शहरावर घिरट्या घालतात;
सकाळ-संध्याकाळ कोल्हे (सियार) अशुभ आवाज करतात।
मांसभक्षी प्राणी शहराच्या दाराजवळ एकत्र येऊन
भयंकर गर्जना करतात – जणू वीज कडाडल्यासारखा आवाज होतो।"
क्रमशः.....

# उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास

भाग - 2



विश्वास देशपांडे,
चाळीसगाव. 94037 49932



भीमतालच्या तलावात आपल्याला जलविहार करता येतो. आपल्याकडे वेळ असेल तर इथून जवळच असलेल्या नौकुचियाताल, विक्टोरिया बांध, आणि भीमेश्वर महादेव मंदिर आदी ठिकाणांना आपण भेट देऊ शकतो.

इथल्या हॉटेलमध्ये आमचा भरपेट नाश्ता झाला. भरपेट म्हणण्याचे कारण म्हणजे येथे नाश्त्यासाठी देखील विविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती. फळे, फळांचे ज्यूस, पोहे, उपमा, इडली सांबार, वडा सांबार, ब्रेड, चहा कॉफी. ज्याला जे आणि जेवढे हवे ते घ्या. प्रत्येक पदार्थाची नुसती चव घ्यायचे म्हटले तरी पोट भरून जाते. आता आमची बस नैनितालला जाण्यासाठी सज्ज होती. नाश्ता झाल्यावर सगळेजण आपापल्या जागी बसमध्ये जाऊन बसले. आता निसर्गरम्य डोंगर रांगातून आमची बस वाटचाल करीत होती. रस्ते चांगले पण अरुंद होते. सुट्यांमुळे पर्यटकांची गर्दी झालेली दिसत होती. नैनिताल इथे जाताना वाटेत कैंची धाम म्हणून एक ठिकाण आहे. या ठिकाणी संत निम करोली बाबा यांचा आश्रम आहे. नीम करोली बाबा २० व्या शतकातील एक महान संत होऊन गेले. त्यांचे वागणे बोलणे अतिशय साधे होते. उत्तर प्रदेशातील नीम करोली या गावी त्यांनी तपश्चर्या केली. म्हणून त्यांना नीम करोली बाबा या नावाने ओळखले जाते. त्यांना कंबलीवाले बाबा म्हणूनही ओळखले जाते कारण त्यांच्या अंगावर कायम पांढऱ्या रंगाची घोंगडी असे. ते हनुमंताचे परमभक्त होते. लोक त्यांना हनुमानाचा अवतार म्हणूनच ओळखत. ते लोकांना रामनामाचा उपदेश देत असत. ॲपलचे संस्थापक स्टीव्ह जॉब्स आणि फेसबुकचे संस्थापक मार्क झुकेरबर्ग यांनी देखील त्यांचे अध्यात्मिक मार्गदर्शन घेतले होते असे सांगितले जाते. कैंची धामला दरवर्षी बाबांचे लाखो भक्त भेट देतात. आश्रमात श्रीराम आणि हनुमानजी यांच्या सुंदर मूर्ती आहेत. बाबांबद्दल अनेक चमत्कारिक आणि अद्भुत कथा सांगितल्या जातात. या ठिकाणी थांबून आम्ही दर्शन घेतले. हजारो भाविकांनी या ठिकाणी गर्दी केली होती.

तेथील दर्शन आटोपून आम्ही नैनितालच्या दिशेने निघालो. तिथे थेटपर्यंत बस जात नाही. त्यामुळे साधारण तीन किमी अलिकडे बस उभी करून स्थानिक जीपच्या साहाय्याने तिथे जावे लागते. एका जीपमध्ये साधारण सहा माणसे बसतात. केवळ पंधरा मिनिटांचा प्रवास करून आम्ही नैनिताल शहरात प्रवेश केला. क्रमश:......

# कृषि-सागर



सागर राजेंद्र सोनवणे
BSc.Agri.
मो. 77578 47104
ताडपिंपळगाव ता.कन्नड
जिल्हा छत्रपती संभाजीनगर

## रासायनिक गोळ्यांना 'मोसंबी' हा नैसर्गिक पर्याय - वैद्यकीय क्षेत्रासाठी एक नवी दिशा

सध्याच्या बदलत्या हवामानात आणि वाढत्या प्रदूषणामुळे मानवी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती (Immunity) टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान बनले आहे. यासाठी आपण अनेकदा व्हिटॅमिन-सी च्या कृत्रिम गोळ्यांचा (उदा. लिम्सी) आधार घेतो. मात्र, आधुनिक वैद्यकशास्त्र, आयुर्वेद आणि होमिओपॅथी या तिन्ही शाखांमधील तज्ज्ञांच्या मते, शरीराला लागणारी जीवनसत्त्वे जर नैसर्गिक स्रोतातून मिळाली, तर त्याचे परिणाम अधिक शाश्वत आणि दुष्परिणामरहित असतात.

तिन्ही पॅथींच्या दृष्टिकोनातून मोसंबीचे महत्त्व:


ॲलोपॅथी : आधुनिक विज्ञानानुसार मोसंबीमध्ये 'एस्कॉर्बिक ॲसिड' भरपूर प्रमाणात असते. हे रक्तातील पांढऱ्या पेशींची कार्यक्षमता वाढवते, ज्यामुळे शरीर संसर्गाशी लढण्यास सक्षम होते. शस्त्रक्रियेनंतरच्या रिकव्हरीसाठी डॉक्टर व्हिटॅमिन-सी युक्त फळांचा सल्ला देतात.

आयुर्वेद : आयुर्वेदात मोसंबीला 'मधुर-अम्ल' रसात्मक मानले जाते. हे वात आणि पित्त दोष संतुलित करण्यास मदत करते. यातील पाचक गुणधर्मांमुळे हे रक्ताची शुद्धी करणारे आणि यकृताला बळकटी देणारे फळ मानले जाते.

होमिओपॅथी : होमिओपॅथीमध्ये रुग्णाच्या नैसर्गिक शक्तीला (Vital Force) उत्तेजित करण्यावर भर दिला जातो. मोसंबीसारखी नैसर्गिक फळे शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवून औषधांच्या कार्यास पूरक ठरतात. क्रमश:.....

# संत कबीर

ज्योतिर्मय साहित्य



भारत भूमी म्हणजे संत-महात्म्यांची पावन भूमी होय. भारताच्या पावन भू- वर अनेक थोर, महान, संत-महात्मे, कवी, विचारवंत होऊन गेले. ज्यांनी आपल्या लिखाणातून, विचारातून अध्यात्मिकता जन्माला घातली. चांगल्या विचारांची रुजवणूक केली. अध्यात्मिकतेची बीजे रोवली. त्यातलेच एक श्रेष्ठ कवी म्हणजे ''संत कबीरदास''. संत कबीरदास यांच्या बाबतीत असे म्हटले जाते कि, संत कबीर हे काळाच्या पुढे असलेले कवी होते. समाजसुधारक होते.

त्यांनी आपल्या दोह्यातून समाज सुधारणा केली. समाजात कांही लोकांकडून पसरवलेले थोतांड, कर्मकांड, अंधश्रद्धा या गोष्टींवर प्रखर व कडक शब्दांमध्ये आवाज उठवून समाज सुधारणा करणारे कवी म्हणजे संत कबीर होत.

धर्माधर्मातील व समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा, चालीरिती, यावर आपल्या विचारशील दोह्याच्या माध्यमातून टिका केली. आणि त्यात सुधारणा करुन धर्माधर्मात चांगले व शुद्ध विचार पसरवले.संत कबीर यांच्या लोकप्रिय दोह्यातील एक दोहा :

गुरु गोविंद दोऊ खडे, काके लागू पाय,

बलिहारी गुरु आपने, गोविंद दियो मिलाय

अर्थ :

जर आपल्या समोर गुरु आणि ईश्वर एकसाथ उभे राहिले तर आपण सर्वप्रथम कोणाचे चरण स्पर्श करणार?. गुरूंनी आपल्या ज्ञानाने ईश्वराला भेटण्याचा मार्ग दाखविला. त्यामुळे गुरूंची महिमा ईश्वरापेक्षा वर आहे. म्हणून आपण गुरुचे चरण स्पर्शीले पाहिजे. आपल्या आयुष्यात आपल्या गुरूंचे स्थान हे सर्वश्रेष्ठ आहे. ''गुरुवीन दुजा और न कोई''. गुरुशिवाय आपल्याला ज्ञानाचा



सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. 9960028899

सागर कोणीही मोकळा करुन देऊ शकत नाही. गुरूंकडून आपल्याला ज्ञानाची, संस्कारांची, चांगल्या विचारांची, निती-मूल्यांची जी शिदोरी मिळते ती शिदोरी आयुष्यात कधीच सरतही नाही आणि उरतही नाही. म्हणून आपल्या आयुष्यात गुरूंचे स्थान सर्वात वरचे स्थान आहे.

गुरु आपल्याला ईश्वराला, परमात्म्याला ओळखण्याचा मार्ग दाखवितात. गुरु आपल्याला योग्य मार्ग दाखविण्याचे पुण्य कर्म करतात. म्हणून गुरुच सर्वश्रेष्ठ व्यक्ती होय. आपण गुरूंकडून मिळालेल्या ज्ञानामुळे, चांगल्या विचारातुन मिळालेल्या शिकवणीमुळेच यशस्वी होतो. गुरूंकडूनच आपल्याला सर्व गोष्टींची शिकवण मिळते.

संत कबीर यांनी आपल्या जीवनातील गुरूंचे स्थान, त्यांची सर्वश्रेष्ठता, त्यांची अगणिक विचारसरणी याबद्दल सविस्तर विचार मांडले आहेत.

संत कबीर यांनी आपल्या दोह्यातून गुरूंविषयी खुप सुंदर विचार जगासमोर ठेवले आहेत. संत कबीर यांचे दोहे जे ऐकायला मधुर वाटतात. त्या मधुर दोह्यातूनच त्यांनी समाज मनावर निर्मळ प्रकाश टाकला. आजही संत कबीर यांचे दोहे समस्त मानवी जीवनाला प्रेरणा देत आहेत आणि सदैव देत राहणार. त्यांच्या दोह्यातील समर्पकता एवढ्या शतकानंतरही समर्पक वाटतात. अनेक युगे लोटली गेली, पुढे लोटली जातील. पण तरीही संत कबीर यांचे दोहे, विचार, विज्ञानवादी दृष्टीकोन येणाऱ्या प्रत्येक युगात अशीच प्रेरणा देत राहणार.


# अभियंता होण्याचे स्वप्न

ज्योतिर्मय साहित्य

माझे जन्मगांव भोकरदन जि.जालना. तिथेच माझे जि.प.हायस्कूल मधून नववी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. नंतर मॅट्रीक ची परिक्षा मी विज्ञान वर्धिनी हायस्कूल संभाजीनगर येथून दिली व मराठवाडा विभागात सर्व तृतीय येण्याचा बहुमान ही मिळविला.

पुढील शिक्षणासाठी शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय संभाजीनगर येथे विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. तेंव्हा शाळेतील व महाविद्यालयातील वातावरणात खुप फरक असल्याचे जाणवले. मी मराठी माध्यमाचा विद्यार्थी असल्यामुळे महाविद्यालयात सुरुवातीला दोन-तीन महिने वर्गात काय शिकविले जाते हे समजत नव्हते. सर्वकाही डोक्यावरून जाते असे वाटत होते. परंतु चिकाटीने वेग वेगळ्या पुस्तकांचा आधार घेऊन प्रथम विषयातील संकल्पना समजून घेतल्या व जोमाने अभ्यास केला व चांगल्या प्रकारे गुण मिळवून पी.यु.सी मध्ये उत्तीर्ण झालो.

प्रा. प्रमोद दसरे, पुणे.
मो.नं. 9850183909



नंतर पी.पी.सी ला प्रवेश घेतांना दोन ग्रुप डोळ्यासमोर दिसत होते. एकतर मेडिकल ग्रुप व दूसरा म्हणजे इंजीनियरिंग ग्रुप. मला गणित या विषयात अधिक रुची असल्याने मी इंजीनियरिंग ग्रुप ची निवड केली. खुप अभ्यास करुन ६९% गुण मिळवून उत्तीर्ण झालो, अन् अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे वेध लागले. मी अभियंता होण्याचे स्वप्न बाळगून होतो. तो ७०-७१ चा काळ होता. त्या काळी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेण्याची स्पर्धा मुळीच नव्हती. कारण ४५%गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांनाही सहज प्रवेश मिळत होता. तशा प्रकारच्या जाहीराती वर्तमान पत्रात येत होत्या. आम्हाला वर्तमान पत्र वाचण्याची सवय असल्यामुळे या संदर्भातील विविध बातम्या वाचायला मिळत असत. त्याकाळी संपूर्ण देशात किती इंजीनियर आहेत व किती बेकार आहेत याची आकडेवारी वेळोवेळी वर्तमान पत्रातून वाचण्यात आली होती. त्यामुळे इंजीनियर होऊन परत या संख्येत एकाची भर घालायला नको असेही वाटायचे. आई वडिलांचे जास्त शिक्षण झाले नव्हते, त्यामुळे त्यांच्या कडून मार्गदर्शनाची अपेक्षा नव्हती. ते म्हणायचे जे काही करायचे ते तुम्हीच ठरवा. तसेच मित्र परिवार किंवा

नातेवाईक मंडळी कडूनही या संदर्भात मार्गदर्शन मिळाले नाही.

द्विधा परिस्थिती निर्माण झाली. काय करावे काय करु नये अशा गोंधळाच्या परिस्थितीत शेवटी बी.एस.सी. द्वितीय वर्षात प्रवेश घेतला .पुढे गणित या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त करुन प्राध्यापक म्हणून रुजु झालो.

अर्थात, या शिक्षण क्षेत्रातही मी मनापासून, प्रामाणिक पणे व निष्ठेने काम केले व शिकविण्याचा आनंद घेतला. असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात आपला खारीचा वाटा आहे याचे समाधानही निश्चित मिळाले. या क्षेत्रातही मी संपूर्ण पणे समाधानी होतो.

मी प्राध्यापक झाल्यानंतर मला बरेच जण म्हणायचे की तू अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घ्यायला हवा होता, चीफ इंजीनियर पर्यंत पोहोचला असता. परंतु त्यावेळेस वेळ निघून गेली होती. मात्र तत्कालीन परिस्थिती व योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे मी अभियंता होऊ शकलो नाही याची खंत सतत मनाला बोचत होती.

जेंव्हा माझी मुलगी व मुलगा दोघेही इंजीनियर झाले तेंव्हा माझे अभियंता होण्याचे अधूरे स्वप्न त्यांच्या रूपाने पूर्ण झाल्याचे मला नेहमीच वाटते.

# उत्तम पुस्तक हे अमृतफळाचे झाड असते-प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे

ज्योतिर्मय साहित्य



सातारा: 'पुस्तकपर्व ग्रंथभांडार'यांच्यावतीने व दीपलक्ष्मी नागरिक सहकारी पतसंस्था यांच्या सहकार्याने दिलीपराज ग्रंथोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, विनोद कुलकर्णी, काका पाटील, श्रीराम नानल, राजेंद्र शेजवळ, विजय साबळे व शिरीष चिटणीस यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

सदर उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे म्हणाले, दिलीपराज प्रकाशानाचे पुस्तक पर्व प्रदर्शन हा ग्रंथांचा उत्सव आहे. यानिमित्ताने साताऱ्यामध्ये पुस्तकांचे जग निर्माण झाले आहे. पुस्तके वाचकांना विश्वनागरिक करतात. पुस्तकांचे जग अफाट असते. पुस्तकाच्या जगात शिरले की मनावरचे मळभ दूर होते. सध्या माणूस मोबाईलच्या अतिवापरामुळे पुस्तकांच्या जगापासून दूर जातो आहे. चटपटीत करमणूकीमुळे मानसिक संतुलन बिघडत चालले आहे. पुस्तके वाचकांना ताणतणावातून मुक्त करून चित्त प्रफुल्लित करतात आणि आत्मिक श्रीमंती बहाल करतात.

घरातील टी.व्ही. फ्रीज सारख्या भौतिक वस्तूंमुळे घराला घरपण येते,पण पुस्तकांमुळे घराला शहाणपण येऊ शकते.आपण ज्ञानाला अमृत म्हणतो. उत्तम पुस्तक हे अमृतफळाचे झाड असते.

काका पाटील म्हणाले, दीपलक्ष्मी संस्कृतीक हॉलमध्ये नेहमीच पुस्तकांचे प्रदर्शन आणि ५० टक्के डिस्काउंट मध्ये ग्रंथ विक्री चालू असते.यावेळीही ५० टक्के किमतीत पुस्तक विक्री चालू आहे. हे प्रदर्शन १५ मे ते १५ जून पर्यंत सुरू आहे तरी सातारकरांनी, तरुण-तरुणींनी आणि विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.

यानंतर शिरीष चिटणीस म्हणाले दिलीपराज प्रकाशन यांनी महाराष्ट्रभर हा उपक्रम चालू केला आहे.३५% सवलतीच्या दारात पुस्तक विक्रीसाठी उपलब्ध केली आहेत. माझ्या वाचनात एक आलं स्वीडन देशात बालवाडी पासून मुलांना टॅब दिले जातात.तेथील शासनाला पंधरा वर्षानंतर लक्षात आले की नवीन पिढी अभ्यासात मागे पडत चालली आहे.त्यांचे पुस्तकाचे वाचन कमी झाल्यामुळे प्रश्न निर्माण झाले आहेत.म्हणून त्यांनी आत्ता ९०० कोटी पेक्षा जादा खर्च करून शाळांमध्ये वह्या, पुस्तके, पेन्सिल, पेन देऊन पुन्हा प्रत्येक वर्गा वर्गात हा पूर्वीचा प्रोजेक्ट चालू केला आहे. त्यामुळे पुस्तक वाचनाची आवश्यकता जास्त आहे.

# साहित्य आणि चित्रकला

ज्योतिर्मय साहित्य

माझे मित्र प्रसिद्ध चित्रकार रविमुकुल यांनी लिहिलेला 'शब्दांनंतरचं सर्जन' हा लेख ज्येष्ठ विचारवंत आणि लेखक विनय हार्डीकर यांच्या पंचाहत्तरीनिमीत्त जो 'नव्या युगाचे पाईक' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला त्यामध्ये आहे. मी हा लेख वाचत होतो. त्या लेखात रविमुकुल म्हणतात... मी चित्रकार असल्याची एकच ठळक खूण मला पुरेशी आहे आणि ती म्हणजे मला सर्वत्र चित्र दिसतात. अगदी सगळीकडे. खर तर ती असतातच म्हणून दिसतात हेच सत्य. पण मग इतर सर्वांना म्हणजे माझ्या मित्रांना, जवळच्यांना ती का दिसू नयेत?. याच लेखात त्यांनी असेही म्हंटले आहे कि, आजवर एकाही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात चित्रकाराचा सत्कार झालेला नाही. बा. सी. मर्ढेकरांच्या दृष्टीने साहित्य म्हणजे केवळ लिखित शब्द नसून त्याचबरोबर चित्र, शिल्प, आणि संगीतही येते. साहित्य महामंडळाला मात्र हे अजून उमगलेले नाही. चित्र, शिल्प यांच साहचर्य नसल्यामुळे मराठी साहित्याचेच नुकसान झाले आहे. त्याचाच परिणाम म्हणून कलाकाराच्या जीवनावरील एकही अशी मराठी साहित्यकृती कधी विश्वासार्ह झाली नाही. हे वाचत असतानाच मला एप्रिल महिन्यात वृत्तपत्रात वाचनात आलेली



बातमी आठवली. १३ एप्रिल २०२६ रोजी इटलीतील बोलोग्ना बालपुस्तक मेळाव्यात 'हॅन्स क्रिश्चियन अँडरसन'

शिरीष चिटणीस
सातारा ७५८८६५०५१



पुरस्कार जो बालसाहित्यातील सर्वोच्च आंतरराष्ट्रीय सन्मान पुरस्कार म्हणून ओळखला जातो तो २०२६ साठीचा पुरस्कार ब्रिटिश लेखक मायकेल रोजन यांना लेखन विभागासाठी आणि चिनी रेखाचित्रकार कै गाओ ( ०) यांना चित्रकला विभागासाठी जाहीर करण्यात आला. या पुरस्काराला बालसाहित्यातील नोबेल मानले जाते.

गेल्या सत्तर वर्षापासून म्हणजे १९५६ सालापासून दर दोन वर्षांनी 'हॅन्स क्रिश्चियन अँडरसन या परिकथा लेखकाच्याच नावाने बालसाहित्याचा जागतिक पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार इंटरनॅशनल बोर्ड ऑन बुकस् फॉर यंग पिपल (आय बी बी वाय) याव्दारे दिला जातो. पहिली १० वर्षे म्हणजे १९६६ पर्यंत हा पुरस्कार लेखकांसाठी दिला जात होता.

१९६६ पासून हा पुरस्कार लेखकाबरोबरच चित्रकारासाठीही सुरू करण्यात आला. चित्रकाराचे महत्त्व हे लेखका एव्हडेच आहे, किंबहुना बालसाहित्य वाचताना बाळगोपाळांसाठी शब्दांपेक्षा चित्र महत्वाचे असते. दर दोन वर्षांनी एका लेखक आणि एका चित्रकाराला सोन्याचे पदक आणि डिप्लोमा 'हॅन्स क्रिश्चियन अँडरसन' पुरस्काराच्या वेळी मिळतो. पुरस्काराचा उद्देश संपूर्ण कारकीर्दीत बालसाहित्याला महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या लेखकाचा आणि चित्रकाराचा सन्मान हा असतो.

यावर्षी पुरस्कार मिळालेले लेखक मायकेल रोजन हे दोनशे पेक्षा जास्त बालपुस्तकांचे लेखक आहेत. ज्यामध्ये 'वुई आर गोईंग ऑन अ बेअर हंट'सारखी लोकप्रिय कविता आणि मायकेल रोझेनस सॅड बुक या पुस्तकाचा समावेश आहे. कै गाओ या लेखिकेने चाळीसहून अधिक चिनी लोकथा-प्रेरित चित्रपुस्तके तयार केली आहेत. कै गाओ या लेखिकेचा जन्म चीन देशातील हुआन प्रांतातला. त्या चीन देशामधील अग्रणी चित्रपुस्तके निर्मात्या आहेत. त्यांच्या आजीच्या लोककथा आणि बालगीतांमुळे प्रेरित होऊन त्यांनी प्राथमिक शिक्षिका म्हणून करिअर सुरू केले आणि १९८० मध्ये द ब्युटिफुल गार्डन हे पहिले पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाने चीन देशातील चित्रपुस्तक चळवळीला चालना दिली. आय बी बी वाय च्या ज्युरीने त्यांच्या चित्रपुस्तकातील चित्रांना ''असाधारण गुणवत्ता, कलात्मकता आणि अभिव्यक्ती'' यासाठी मान्यता दिली. कै गाओ या लेखिकेच्या चित्रांच्या साठीच्या ब्रशवर्कमध्ये पारंपरिक चिनी कला आणि आधुनिक दृष्टीकोनांचा मेळ आहे. ज्यात समृद्ध रंग, जीवनाची खात्री, लवचिकता आणि जिज्ञासू दृष्टीकोन दिसतो. कै गाओ या चित्रकार लेखिकेने चिनी लोककथांवर आधारित जी चाळीस चित्रपुस्तके निर्माण केली आहेत ती जगभरातील मुलांना अपूर्व सौंदर्याचा खजीना आणि या चित्रांतून सकारात्मक संदेश देतात.

(क्रमशः)

मराठीतील साहित्यावर चालणारे एकमेव ई दैनिक

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

नवोदित साहित्यिकांचे हक्काचे व्यासपीठ म्हणून अल्पावधित लाखों वाचकांचे मने जिंकणारे,

प्रत्येकाला आपले वाटते असे एक आकर्षक ई दैनिक. साहित्यावर आधारित बित्तंबातमी, लेख, लघुकथा, दीर्घकथा, कविता, पुस्तक परीक्षण, नाट्य, कला, शिक्षण, संस्कृतीचा वेध, अध्यात्म, कृषि, पर्यटन, बाल साहित्यापासून आयुर्वेदापर्यंत ज्ञान - विज्ञान - मनोरंजन सर्वकाही उपलब्ध.

- सर्व प्रकारच्या जाहिरातीसाठी फक्त 100 रुपये एका दिवसासाठी.
- साहित्य प्रकाशित करण्यासाठी वार्षिक वर्गणी वयक्तिक फक्त 500 रुपये व संस्थेसाठी फक्त 1000 रुपये.
- पेपर वाचण्यासाठी टाईप करा - www.jyotirmaysahitya.com
- ऑनलाईन पेमेंटसाठी - 7743918559

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559